# सकारात्मक बदल स्वीकारले

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; 'सकाळ' कार्यालयास सदिच्छा भेट, विविध विषयांवर संवाद

**कोल्हापूर, ता. ९ : कोरोनामुळे अध्यापन-अध्ययनात आमूलाग्र बदल झाला. शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापरही वाढला. शिवाजी विद्यापीठाने हा बदल सकारात्मकपणे स्वीकारला असून, ऑनलाइन परीक्षांमधून परिवर्तन पाहायला मिळाले. भविष्यातही तंत्रज्ञान विकसित करण्यापासून ते त्याचा अवलंब प्रभावीपणे करण्यापर्यंत विद्यापीठ कमी पडणार नाही, असा विश्वास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केला. आज त्यांनी सकाळ कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. निवासी संपादक निखिल पंडितराव यांनी त्यांचे रोप देऊन स्वागत केले.**

कोरोनानंतरच्या शिक्षणातील बदलांबद्दल शिर्के म्हणाले, "कोरोनामुळे उच्च शिक्षणात बदल झाले. विसाव्या शतकातील शिक्षकांनी एकविसाव्या शतकातल्या तंत्रकुशल पिढीला तंत्रज्ञानाचा प्रभावी अवलंब करून शिकवले. ऑनलाइन परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका संच बनवले. कोणतीही तांत्रिक अडचण न येता ऑनलाइन परीक्षा झाल्या. हे सर्व पाहता ऑनलाइन तंत्राचा वापर करण्यासाठी प्राध्यापकांची मानसिकता तयार झाली. भविष्यात विद्यापीठ परीक्षा घेण्यासाठी आवश्यक असणारे स्वतःचे सॉफ्टवेअर तयार करणार आहे. अभ्यासक्रमातील अधिकाधिक भाग ऑनलाइन पद्धतीने शिकवला जाणार आहे. विद्यापीठाला 'पंडित मदन मोहन मालवीय नॅशनल मिशन ऑन टीचर्स अँड टीचिंग' अंतर्गत 'सायबर



सिक्युरिटी' प्रोजेक्ट मिळाला आहे. याशिवाय 'सेंटर ऑफ एक्सलन्स इन व्ही.एल.एस.आय सिस्टीम डिझाईन हा प्रकल्प रुसाकडून मिळाला आहे. संख्याशास्त्र, संगणकशास्त्र, फिजिक्स इलेक्ट्रॉनिक्स विभाग तंत्रज्ञानाचा वापर अधिक करतात; मात्र मराठी आधीविभागानेही ऑनलाइन तंत्राचा अभिनव उपयोग करून उपक्रम राबवले. आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, डेटा सायन्स, विविध प्रकारचे डिजिटल तंत्रज्ञान यांचा प्रभावी वापर




**कोल्हापूर : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सोमवारी 'सकाळ' कार्यालयास सदिच्छा भेट दिली. रोप देऊन त्यांचे स्वागत करताना निवासी संपादक निखिल पंडितराव.**

विद्यापीठाच्या कामकाजात होईल."

नॅक मूल्यांकनबाबत डॉ. शिर्के म्हणाले, "नॅकने मूल्यांकन पद्धती बदलली. नव्या पद्धतीतील चार टप्पे विद्यापीठाने पार केले. पाचवा अंतिम टप्पा लवकरच होईल. विद्यापीठाने याची परिपूर्ण तयारी केली असून, मूल्यांकनात विद्यापीठ सर्वोच्च कामगिरी करेल. पारंपरिक विद्याशाखेतील विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास करून त्यांना रोजगारक्षम बनवण्यासाठी काही योजना आखणार आहे." 'सकाळ'चे मुख्य बातमीदार निवास चौगुले यांनी आभार मानले.

### ऑलिंपिक ध्येय

विद्यापीठाचा क्रीडा विभाग सर्व साधनांनी सुसज्ज आहे. त्याचा लाभ अधिकाधिक खेळाडूंना होईल, यासाठी आराखडा बनवणे सुरू आहे. भविष्यात शिवाजी विद्यापीठातील एक खेळाडू ऑलिंपिकमध्ये सहभागी होईल, असे ध्येय असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.